आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ जून २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या सर्वसाधारण सभेला प्रधानमंत्री आज संबोधित करणार

- विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन

- सिक्किममध्ये भूस्खलनामुळे ३ जणांचा मृत्यू, दीड हजार पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात यश

- इस्रायलने केलेल्या गोळीबारात राफामधे ३० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू, १७९ जण जखमी

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सला नमवत किंग्ज इलेव्हन पंजाब संघ अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं IATA अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होणार आहेत. यावेळी मोदी उपस्थितांना संबोधित करतील. कालपासून सुरू झालेल्या IATA कार्यक्रमाची उद्या सांगता होईल. या कार्यक्रमादरम्यान, जगभरातील नेते भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात झालेल्या उल्लेखनीय परिवर्तनाचे आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात त्याच्या योगदानाचे साक्षीदार होतील, असं प्रधानमंत्री कार्यालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. IATA ची शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा ४२ वर्षांपूर्वी १९८३ मध्ये झाली होती.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पॅराग्वेचे अध्यक्ष सँटियागो पेना पॅलासिओस यांची आज भेट घेतली. प्रधानमंत्री मोदी यांच्या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण क्षेत्राचा आढावा घेतल्याची अपेक्षा आहे.

पॅलासिओस हे आज सकाळी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत पोहोचले. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी त्यांची भेट घेतली आणि विविध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली. यानंतर ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचीही भेट घेणार आहेत. पॅराग्वेला परतण्यापूर्वी ते मुंबईलाही भेट देणार असून या भेटीदरम्यान ते राजकीय नेते, व्यावसायिक तसंच विविध उद्योगांचे प्रतिनिधी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या व्यक्तींची भेट घेतील.

**<><><><><>**

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. बिहारमधल्या मोतिहारी इथं शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याबाबत आयोजित केलेल्या चर्चेत ते आज बोलत होते. देशभरात १६ हजार शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. उत्पादनात वाढ करणं, उत्पादन खर्च कमी करणं, आणि शेतमालासाठी दर सुनिश्चित करणं यावर ते काम करत असल्याचं कृषीमंत्री म्हणाले. सरकार डाळी, तेलबिया यांच्या लागवडीला प्रोत्साहन देत असून शेती अधिक फायदेशीर करणं हा सरकारचा उद्देश आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय अर्थव्यवस्थेची सर्वात मोठी शक्ती शेती आहे, असं चौहान म्हणाले.

- **- होल्ड बाईट - चौहान -**

**<><><><><>**

दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णूतेचा भारताचा संदेश जगभरात पोहोचवण्यासाठी विविध देशांमध्ये बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं काल इथियोपिआ इथला दौरा पूर्ण करून आज ते इजिप्तला पोहोचले आहेत.

जनता दल यूनायटेडचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं मलेशियाचे राष्ट्रीय एकता मंत्रालयाचे उपमंत्री पार्टी केडिलन राकयात यांची भेट घेतली.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं लायबेरियातल्या भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधला.

भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं ब्रिटनच्या परराष्ट्र सचिव प्रीती पटेल यांची भेट घेतली.

भाजप खासदार बैजयंत जय पांडा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल रात्री अल्जेरियाचे परराष्ट्र व्यवहार, सहकार्य आणि राष्ट्रीय समुदाय समितीचे अध्यक्ष मोहम्मद खौआने यांची भेट घेतली.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ सध्या ब्राझीलमध्ये आहे आणि उद्या अमेरिकेला जाणार आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तेलंगणा राज्याच्या नागरीकांना राज्यदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. तेलंगणा राज्य आपल्या प्रगतीशीलतेसाठी आणि अद्वितीय संस्कृतीसाठी ओळखलं जात असून राज्यानं विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर गेल्या दहा वर्षांत सरकारनं राज्यातल्या जनतेच्या विकासासाठी अनेक उपाययोजना केल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

कैलास मानसरोवर यात्रेसाठी सरकारनं सर्व तयारी केली असून यात्रेकरूंचा पहिला गट १५ जूनला गंगटोक इथं दाखल होईल. यात्रेकरूंचे १० गट यात्रेला जाणार असून प्रत्येक गटात ४८ यात्रेकरू असतील. सुमारे २१ दिवसांच्या प्रवासानंतर हे गट मानसरोवरला पोहोचतील. यात्रेसाठी रवाना होण्यापूर्वी हे यात्रेकरू दिल्लीत वैद्यकीय तपासणीसाठी थांबतील.

<><><><><>

सिक्किममध्ये चटेन क्षेत्रात काल झालेल्या भूस्खलनामुळे ३ जणांचा मृत्यू झाला असून बचावकार्य सुरू आहे. सिक्कीमच्या लाचुंगमधून १ हजार सहाशे अठ्ठ्याहत्तर पर्यटकांना सुरक्षितपणे हलवण्यात आलं आहे. २९ मे ला झालेल्या ढगफुटी आणि धुवांधार पावसामुळे पर्यटक अडकले होते. लाचेन, लाचुंग, गुरुडोंगमार, फूल व्हॅली आणि झिरो पॉइंटसारख्या ठिकाणांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. भूस्खलन आणि पूल कोसळण्यामुळे डिकचु-संकलांग-शिपग्येर, चुंगथांग-लाचेन-जीमा आणि चुंगथांग-लाचुंग रस्ते बंद असून रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

**<><><><><>**

तृतीया सम्मेलन प्रस्तुती समिती या माओवादी संघटनेनं झारखंडमधल्या हजारीग इथं बीजीआर खाण कंपनीच्या दोन वाहनांना काल रात्री पेटवून दिलं तसंच अंदाधूंद गोळीबार केला. यात एक जण जखमी झाला आहे.  खलारी - डाकरा प्रकल्पा अंतर्गत कोळसा काढण्याचं काम बीजीआर कंपनी करते. या कंपनीच्या दारात उभी असलेली दोन वाहनं माओवाद्यांनी पेटवून दिली. यात जखमी झालेल्या तरुणाला रुग्णालयात  दाखल करण्यात आलं आहे. माओवाद्यांनी पलायन करण्याआधी या जागेवर पत्रकं सोडली. खाण कंपन्यांनी तृतीय सम्मेलन प्रस्तुती समितीच्या परवानगीशिवाय कोणतंही काम करू नये असा इशारा यात देण्यात आला आहे.

**<><><><><>**

गाझापट्टीत राफा इथं अन्न साहाय्य वितरण केंद्राजवळ झालेल्या गोळीबारात ३० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला असून १७९ जण जखमी झाले आहेत. इजरायली सैन्यानं आणि अमेरीका आधारित गाझा मानवतावादी फाऊंडेशननं हिंसा झाल्याचं नाकारलं आहे. दरम्यान हमासनं गाझा शस्त्रसंधी करारावर ताबडतोब नवीन अप्रत्यक्ष चर्चा सुरू करण्याची आपली तयारी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूरने आज जेईई ऍडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर केला. result25.jeeadv.ac.in. या संकेतस्थळावर हा निकाल उपलब्ध असेल. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधे पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी ही परीक्षा आवश्यक असते.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात किंग्ज इलेव्हन पंजाब संघानं मुंबई इंडियन्स संघाचा ५ गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. मुंबईनं दिलेलं २०३ धावांचं आव्हान पंजाबने कर्णधार श्रेयस अय्यरच्या नाबाद ८७ धावांच्या जोरावर एक षटक राखून सहज पार केलं. आता विजेतेपदासाठी किंग्ज इलेव्हन पंजाब आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात उद्या अहमदाबाद इथं लढत होणार आहे.

**<><><><><>**

चौथ्या थायलंड खुल्या आंतरराष्ट्रीय मुष्टीयोद्धा स्पर्धेत दीपक आणि नमन तंवर यांनी काल दोन सुवर्ण पदकं पटकावून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. दीपकने ७५ किलो वजनी गटात उजबेकिस्तानच्या खेळाडूला ५-० ने हरवलं तर नमनने चीनच्या खेळाडूला ९० किलो वजनी गटात ४-१ अशी मात दिली.

महिलांच्या ८० किलो वजनी गटात भारताच्या किरणला कझाकिस्तानच्या खेळाडूकडून पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

स्टॅव्हॅन्जर सिटी इथं काल रात्री झालेल्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या सहाव्या फेरीत विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशनं जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनचा पराभव केला.

//<><><><><>//